# भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.
# जि.ठाणे.

## भिवंडी महानगरपालिकेचा, सन - २०१६-२०१७ चा अर्थसंकल्पांस महासभेची मान्यता.
## नागरीकांवर कोणताही कराचा बोजा नाही.

भिवंडी नि. शहर महानगरपालिकेचे सन - २०१६-२०१७ सालाचे अंर्थसंकल्प (बजेट) नुकताच पार पडलेल्या मा.महासभेमध्ये मा. सभापती, स्थायी समिती श्री. शेख आरिफ़ अबुल कलाम व सर्व स्थायी समिती सदस्य यांनी संयुक्तिकपणे मा. महासभेत महापौर श्री. तुषार यशवंत चौधरी यांचेकडे मनपा आयुक्त श्री. बालाजी खतगांवकर व उपस्थित पदाधिकारी,सदस्य व मनपा अधिका-यांच्या उपस्थितीत मंजूरीसाठी सादर करण्यांत आला व त्यास महासभेने तात्काळ मंजूरी दिली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ तरतुदीप्रमाणे मनपा आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांनी पुढील सरकारी वर्षाच्या उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन मा.स्थायी समितीकडे मंजूरीकरीता यापूर्वीच सादर  होते,त्यावर मा.स्थायी समितीच्या सभेमध्ये सर्व सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन खालीलप्रमाणे महासभेस शिफारस करीत मंजूरीस पाठविले होते.

सन-२०१५/२०१६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन-२०१६/२०१७ करीता मूळ अर्थसंकल्प **अ** मधील महसुली व भांडवली जमा खर्चाच्या अर्थसहाय्याच्या अनुषंगाने पुढील अर्थसंकल्प म्हणजेच **क** पाणीपुरवठा व मल:निस्सारण अर्थसंकल्प **पी** प्युअर अर्थसंकल्प,अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन अर्थसंकल्प,महिला व बाल कल्याण अर्थसंकल्प,अंध व अपंग कल्याण अर्थसंकल्प,वृक्ष संवर्धन अंर्थसंकल्प,शिक्षण विभाग अर्थसंकल्प,व परिवहन सेवा अर्थसंकल्प अशा नऊ विभागांत मा.आयुक्तांच्या अंदाजानुसार तयार करण्यांत आले होते.त्यात मा.स्थायी समितीने शहरातील नागरीकांच्या भविष्यांत उद्‌भवणा-या अडी-अडचणींच्या समस्यांचा विचार करता,मा.आयुक्तांनी सुचविलेल्या अंदाजित अर्थसंकल्पाच्या तरतूदीमध्ये विविध लेखाशिर्षानिहाय वाढ व घटच्या अनुषंगाने बदल केलेला आहे तसेच नागरीकांच्या सोयीच्यादृष्टीने जन्म व मृत्यू दाखले तसेच दिगरबाद प्रकरणे प्रभागनिहाय करण्यांत आलेली आहेत तसेच मालमत्ता कर जास्तीत-जास्त व प्रभावीपणे वसूल करण्याच्यादृष्टीने १ एप्रिलपासून सुरुवात करुन त्यासाठी विशेष वसुलीपथक तयार करणेचे निश्चित करण्यांत आलेले आहे.

सद्या महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता,महानगरपालिकेच्या उत्पन्नांत वाढ तसेच खर्चात जास्तीत-जास्त काटकसर करुन महापालिका क्षेत्राच्या सर्वांगीण विकासाचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊनच नागरीकांना जास्तीत-जास्त सेवा-सुविधा पुरवून लोकाभिमुख प्रशासन देण्याचा मानस या अर्थसंकल्पामध्ये नमूद आहे.शहरातील नागरीकांना योग्य प्रकारे व सुरळीत पाणी पुरवठा होणेकामी आवश्यक त्या उपाययोजना पार पाडण्यासाठी अंदाजपत्रकांत विशेष नियोजन केले आहे.पाण्याचे स्त्रोत वाढविण्याबाबत सुचना करण्यांत आलेल्या आहेत.तसेच मनपाच्या विविध विभागाकडील उत्पन्न वाढीबाबत किरकोळ दर ठरविणेत आले आहे.प्रशासनामार्फत पाणीपट्टी करामध्ये सुचविलेली वाढ स्थायी समितीच्या सभेत चर्चा होऊन रद्द करण्यांत येऊन या अर्थसंकल्पामध्ये नागरीकांवर कराचा कोणताही बोजा वाढविण्यांत आलेला नाही.

सन-२०१५/२०१६ चे सुधारीत अंदाजपत्रकांत व सन-२०१६/२०१७ चे मूळ अंदाजपत्रक ३४ लाख ७५ हजार मात्र शिल्लक दर्शविणारे रु.५७३ करोड ४० लाख ३३ हजार मात्र रक्कमेचे अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६(४) अन्वये मा.महासभेच्या मान्यतेकरीता सादर करणे आला,त्यावेळी सर्व महापालिका सदस्यांनी सदर अर्थसंकल्पांस मंजूरी दिली.

यावर्षीच्या नवीन अर्थसंकल्पास मंजूरी दिल्याबद्दल मा.महापौर श्री.तुषार यशवंत चौधरी,मा.उप-महापौर श्री.सिध्दीकी अहमद हुसैन,मा.आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर,सभागृह नेते,सर्व गटनेते,सर्व नगरसेवक-नगरसेविका यांनी व

सर्व अधिकारी,कर्मचारी,पत्रकार,शहरातील नागरीक यांनी मोलाचे सहकार्य केल्याबद्दल सभापती, स्थायी समिती श्री. शेख आरिफ़ अबुल कलाम यांनी आभार व्यक्त केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो अशा जयघोषांत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १२५ वा जयंती महोत्सव भिवंडी मनपातर्फे साजरा.

डॉ.बाबासाहेबांचा विजय असो...... अशा जयघोषणाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती भिवंडी निजा.शहर महानगरपालिका व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती सार्वजनिक जयंती उत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.११ एप्रिल ते दि.१४ एप्रिल पर्यंत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करुन व १४ एप्रिल रोजी धामणकरनाका येथून कापआळी मनपाच्या जुन्या इमारतीपर्यंत दि.१४ एप्रिल २०१६ रोजी सजवलेल्या रथातून डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यांत आली यामध्ये भिवंडीतील विविध मंडळे,विविध जातीधर्माच्या जवळपास ६५ हजार महिला,नागरीक सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन दि. ११ एप्रिल २०१६ रोजी मा. महापौर श्री. तुषार यशवंत चौधरी, महापालिका आयुक्त श्री. बालाजी खतगांवकर व जयंती मंडळाचे अध्यक्ष तथा नगरसेवक श्री. विकास निकम व मंडळाचे कार्यकर्ते यांच्या शुभहस्ते करण्यांत आले.दि. ११/४/२०१६ रोजी उत्कर्ष शिंदे यांचा प्रबोधनात्मक बुध्द भिम गीते गायनाचा कार्यक्रम झाला तर दि. १२/४/२०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारीत नाट्य,नृत्य गीतांमधून भीम गीतायन तीन अंकी नाटक सादर करण्यात आले तसेच दि. १३/४/२०१६ रोजी प्रसिध्द गायक शाक्य कबीर यांच्या जागर समतेचा (एकप्रवास....) बुध्द भिमगीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आले असे विविध कार्यक्रम सलग तीन दिवस सादर करण्यात आले.यावेळी महानगरपालिका शाळांमधील, शालांत परीक्षेमध्ये उत्तम गुण मिळविण्या-या १३ विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र,स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यांत आला.

आज दि.१४/४/२०१६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भव्यदिव्य अशी शोभायात्रा काढण्यात आली. या मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र असलेल्या प्रतीमेस मा. खासदार श्री. कपिल पाटील साहेब, आमदार श्री. रुपेशजी म्हात्रे, महापालिकेचे मा. महापौर श्री. तुषार चौधरी, मंडळाचे अध्यक्ष श्री. विकास निकम मनपाच्या, उप-आयुक्त डॉ. विजया कंठे, मनपा नगरसेवक /नगरसेविका, जयंती मंडळाचे सदस्य यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. या प्रसंगी गुलाब पाकळ्यांचा वर्षाव करण्यात आले तसेच फ़टाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. धामणकर नाका कणेरी,गौरीपाडा,मंडई,प्रभुआळी,नवीचाळ,तीनबत्ती,कोटर गेट मशीद मार्गे निघालेल्या या मिरवणूकीमध्ये स्त्रीभ्रूण हत्या,शैक्षणिक जनजागृती,पाणी बचत,चवदार तळे आंदोलन,महिला सन्मान-न्याय इ. विविध विषयावरील देखावे उभे करण्यांत आले होते.याप्रसंगी लाखोंच्या संख्येने विविध जाती धर्माचे नागरीक मिरवणूकीत सामील झाले होते. जयंतीच्या समारोप मिरवणूकीत सहभागी मंडळांना उपस्थित सौ.विजया कंठे,उप-आयुक्त(मुख्यालय) व मध्यवर्ती उत्सव मंडळाचे अध्यक्ष व नगरसेवक श्री.विकास निकम यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

प्रभाग समिती कं.४ च्या कार्यक्षेत्रातील मौजे नारपोली  घर नं.८४२,भंडारी कंपाऊंड,नारपोली-२,भिवंडी. या जागेतील अनधिकृत बांधकामाबाबत बांधकामधारक १) श्री.शंकर भुमय्या कुरे २) श्री.सुधाकर देवराम खैरनार यांनी सदर जागेत अस्तित्वातील तळ मजल्याच्या दुकानाच्या गाळयावर आर.सी.सी.स्लॅब टाकून त्यावर वीट बांधकाम करून सिमेंट पत्राशेडचे अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आलेवरुन  सदरचे अनधिकृत बांधकाम बंद करणेकामी बांधकामधारक यांना महाराष्ट्र मनपा.अधिनियम १९४९ चे कलम २६० (१अे) (अे) (बी) अन्वये तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५५ अन्वये इकडील जा.क्र.भिनिमनपा/प्र.स.क्र.४/शविवि/०५ दि. ११/०४/२०१६ रोजीनुसार नोटीस बजावण्यात आली आहे.

सदरचे अनधिकृत बांधकाम जा.क्र.भिनिशमनपा/प्र.स.क्र.४/शविवि/१०१ दिनांक २६/०४/२०१६ रोजीचे आदेशान्वये तसेच जा.क्र.भिनिशमनपा/प्र.स.क्र.४/शविवि/९९ दि.२६/०४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत पोलीस स्टेशनकडे बंदोबस्ताची मागणी करून दि.१०/०५/२०१६ रोजी पोलीस बंदोबस्त मिळताच मनपाचे अतिक्रमण पथकामार्फत १० X १८ चौ.फुट या मोजमापाचे वीट बांधकाम करून पत्राशेडचे अनधिकृत बांधकाम सकाळी ११.०० वाजे पासुन दुपारी १.३० पर्यत निष्कासीत करण्यात आले आहे.

भिवंडी नि.शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.४ चे सहाय्यक आयुक्त श्री.हरिदास माने, भोईवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी, सहाय्यक बीट निरीक्षक श्री.रमाकांत म्हात्रे, श्री.अमोल वारघडे,तसेच मनपाचे मुख्य अतिक्रमण पथक, व प्रभाग समिती क्र.४ चे अतिक्रमण पथक यांच्या उपस्थितीत सदरचे चौथ्या मजल्याचे अनधिकृत बांधकाम दिनांक १०/०५/२०१६ रोजी निष्कासीत करण्यात आले आहे.

## मौजे कापकणेरी,स.नं.१३, सि.स.नं.७०२,वाहतुक शाखा ऑफिसला लागुन केलेले अनाधिकृत बांधकाम हटविणेकामी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेची धडक मोहीम

दि.०२/०४/२०१६ रोजी सकाळी १०:०० वा. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत मौजे कापकणेरी, स.नं.१३, सि.स.नं.७०२, वाहतुक शाखा ऑफिसला लागुन, भिवंडी याठिकाणी केलेले विटांचे भिंती वरती सिमेंट पत्र असलेले गाळ्याचे बिगरपरवाना अनधिकृत बांधकाम म.न.पा मुख्य अतिक्रमण पथक तसेच प्रभाग समिती क्र १ मधील अतिक्रमण पथका मार्फत निष्कासित करणेची कार्यवाही करण्यात आली आहे.

मा.उप-आयुक्त (कर)- श्री अनिल डोंगरे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली उक्त अनधिकृत बांधकाम हटविणेत आले. या कार्यवाहीसाठी श्री.एच.पी.माने, सहाय्यक आयुक्त,प्रभाग समिती क्रं.१, बिट निरिक्षक श्री. विराज भोईर, श्री. बळीराम तरे, प्रभाग समिती क्र.१, मनपा अतिक्रमण पथक व प्रभाग समिती क्र.१ चे अतिक्रमण पथक यांच्यामार्फत संबंधित शांतीनगर पोलीस स्टेशन यांचे कडून मिळालेल्या पोलीस बंदोबस्तात वरील अनाधिकृत बांधकाम निष्कासित करणेत आले आहे.

## मुख्य रस्त्यावरील अनाधिकृत अतिक्रमण हटविणेकामी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेची धडक मोहीम

दि.१७/०३/२०१६ रोजी सकाळी १०:०० वा. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी प्रभाग समिती क्र.१ व २ अंतर्गत धर्मविर आनंद दिघे चौक ते शांतीनगर पर्यंत मुख्य रस्ता व फुटपाथ वरील हातगाडीवाले व दुकानदार यांचे अनधिकृत अतिक्रमण हटविणेत आले. तसेच सदरचे अनधिकृत अतिक्रमण हटविणेकामी म.न.पा मुख्य अतिक्रमण पथक तसेच प्रभाग समिती क्र १ व २ मधील अतिक्रमण पथक मार्फत अनधिकृत अतिक्रमण हटविणेची कार्यवाही करण्यात आली आहे.

मा.उप-आयुक्त (कर)- श्री अनिल डोंगरे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली उक्त अनधिकृत अतिक्रमण हटविणेत आले. या कार्यवाहीसाठी श्री.एच.पी.माने, सहाय्यक आयुक्त,प्रभाग समिती क्रं.१, श्री अशोक लाडकर, सहाय्यक आयुक्त,प्रभाग समिती क्रं.२ तसेच बिट निरिक्षक श्री. विराज भोईर, श्री. बळीराम तरे, प्रभाग समिती क्र.१, श्री.दिलीप माळी, श्री. हॅनुमान म्हात्रे, प्रभाग समिती क्र.२ यांच्या पथकामार्फत वरील अनाधिकृत अतिक्रमण हटविणेत आले आहे.

02.04




































HUNK